# वित्त विभाग, जिल्हा परिषद

## वित्त विभाग -

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ नियम ३ नुसार जिल्हा परिषदेचे सर्व आर्थिक व्यवहार व सर्व हिशेब (वार्षिक हिशेब तयार करणे व लेखे आणि आर्थिक दस्तऐवज तयार ठेवणे) संदर्भात कार्यवाही वित्त विभागाकडुन करण्यात येते. जिल्हा परिषदेतील वित्त विभागाचे प्रमुख हे मुख्य लेखा व वित्त अधिकारी असुन ते महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक दर्जाचे अधिकारी असुन, लेखा आणि अर्थसंकल्पीय अंदाज या बाबी तसेच आर्थिक नियमांच्या अंमलबजावणी संबंधी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषदेचा वित्तीय सल्लागार व प्राथमिक लेखा परिक्षक म्हणून ते काम करतात. लेखा आणि अर्थसंकल्पीय अंदाज या बाबी तसेच आर्थिक नियमांच्या अंमलबजावणी सबंधी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा परिषदेचा वित्तीय सल्लागार व प्राथमिक लेखा परिक्षक म्हणून ते काम करतात. त्यांना सहाय्यक म्हणून उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी (वर्ग-1) व दोन लेखा अधिकारी (वर्ग-2) असतात.

## वित्त विभागांतर्गत विविध शाखांमार्फत खालील प्रमाणे कामकाज केले जाते

### अंदाजपत्रक व ताळमेळ शाखाः-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नियम 137 व 138 मधील तरतूदींनुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या स्वनिधीचे मुळ अंदाजपत्रक, तसेच सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात येते. सदरच्या अंदाजपत्रकाची छाननी वित्त समितीमध्ये करण्यात येते. समितीने शिफारस केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेकडे सदरचे अंदाजपत्रक मंजूरीसाठी सादर करण्यात येते. सर्वसाधारण सभेत मा.जिल्हा परिषद सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांचा समावेश करुन सुधारित अंदाजपत्रक व मुळ अंदाजपत्रक मंजूर केले जाते. जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक मंजूरीनंतर संबंधित विभागाकडे मंजुर निधीचे वितरण करण्यात येते.

### संकलन शाखाः-

जिल्हातील सर्व पंचायत समिती व मुख्यालयातील जमा व खर्चाचे लेखे एकत्रित करुन जिल्हा परिषदेचा मासिक लेखा तयार केला जातो. मासिक लेखे दरमहा आयोजित वित्त समितीच्या मंजूरी नंतर स्थायी समिती समोर अंतीम मान्यतेसाठी ठेवले जातात.सबंधीत विभागाकडून मासिक लेख्याशी ताळमेळ घेतला जातो. मासिक लेख्यांवरुन जिल्हा परिषदेचा वार्षिक लेखा तयार केला जातो. सदर वार्षिक लेख्याची छाननी वित्त समितीच्या सभेमध्ये केल्यानंतर माहे सप्टेंबर पूर्वी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी सादर केले जातात. जिल्हा परिषद सभेच्या मंजूरीनंतर सदरचे लेखे 15 नोंव्हेबर पुर्वी शासन राजपत्रात प्रसिध्द केले जातात.

**मध्यवर्ती लेखा परिक्षण शाखाः-**

मध्यवर्ती लेखा परीक्षण शाखेमध्ये जिल्हा परिषदेतील खाते प्रमुखांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर प्रशासकिय मान्यता/खर्चास मान्यतेबाबतचे अभिप्राय देण्यात येतात.तसेच प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या देयकांची तपासणी करुन आदायगी बाबतचे शेरे नोंदविण्यात येऊन झालेल्या जमा व खर्चाच्या नोंदी करुन मुख्यालयाचा मासिक लेखा तयार केला जातो. तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त निधीचे नियोजन करून त्याच्या वितरणाची संपुर्ण कार्यवाही या विभागाकडून केली जाते.

**बाह्य लेखा परिक्षण शाखाः-**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचे कडील संदर्भ एपीटी/ 1092/सीआर/76613 दि.7/10/1997 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती मधील लेख्याच्या तपासणी साठी जिल्हा स्तरावर अंतर्गत लेखा परिक्षण पथके निर्माण करणेत आली आहेत. सदर पथकामार्फत पुर्ण झालेल्या आर्थिक वर्षाचे खाते प्रमुख व पंचायत समितीचे अंतर्गत लेखा परिक्षण करण्यात येते. स्थानिक निधी लेखा, पंचायत राज समिती व म.महालेखापाल कार्यालयाकडील लेखा आक्षेपांची पुर्तता करणेसाठी समन्वय व मार्गदर्शन केले जाते. जिल्हा परिषद कर्मचा-यांचे वेतन आयोगानुसार होणाऱ्या सुधारित वेतन निश्चिती पडताळणी या विभागामार्फत केली जाते.

**आस्थापना शाखाः-**

आस्थापना शाखेमार्फत वित्त विभागातील राजपत्रीत अधिकारी व लेखा संवर्गातील कर्मचारी यांचे आस्थापना विषयक कामकाज केले जाते. लेखा संवर्गातील कर्मचा-यांचे आस्थापना व इतर कामकाज (उदा.भरती प्रक्रीया, नेमणूका, पदोन्नत्या, बदल्या, आगावू वेतनवाढी, सेवाज्येष्ठता सूची, सेवानिवृत्तीवेतन प्रकरणे, न्यायालयीन प्रकरणे, गोपनिय अभिलेख संस्करण, इ. केले जाते.) लेखा संवर्गातील कर्मचा-यांचे सर्व परीक्षाविषयक कामकाज, सेवानिवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी, गट विमा, अधिकारी/कर्मचारी यांचे वैद्यकिय प्रतीपुर्ती प्रस्ताव तयार करून मान्यतेसाठी सादर करणे. अतिरिक्त पदभार प्रकरणे मंजूरी, मा.आयुक्त तपासणी बाबतची कार्यवाही इ.बाबतचे कामकाज

**रोख शाखाः-**

रोख शाखेत वेतन, बांधकाम/रस्ते व इतर देयके मंजुर झाल्यावर त्यांचे कामकाजाबाबतचे धनादेश तयार करून वितरीत केले जातात. कोषागारातून प्राप्त धनादेश व इतर जमा खर्चांची नोंद रोखवहीमध्ये घेतली जाते. तसेच प्रत्येक दिवसांचे/मासिक जमा व खर्चाच्या नोदींचा बँकेशी ताळमेळ घेतला जातो.

**भविष्य निर्वाह निधी शाखा/ राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना -**

जिल्हा परिषदेकडील शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग 3 व वर्ग 4 च्या सर्व कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे वित्त विभागामार्फत ठेवले जातात. सदर लेखे आद्यावत ठेवण्यासाठी संगणकीकृत प्रणालीचा वापर केला जातो. भविष्य निर्वाह निधीचे परतावा/नापरतावा तसेच अंतिम अदायगीचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कोषागारातून धनादेश प्राप्त करण्याची कार्यवाही त्वरीत केली जाते. तसेच जिल्हा परिषद सेवेत असताना मृत्यु झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसास ठेव संलग्न योजनेचा लाभ सत्वर अदा केला जातो.

**गट विमा शाखाः-**

राज्य शासकीय कर्मचारी व जिल्हा परिषद कर्मचारी व जिल्हा परिषद अधिकारी/कर्मचारी यांचे गटविमा योजनाविषयक सर्व कामे पाहणे व त्यासंबधी लेखे अद्यावत ठेवणे. गटविमा योजनेसंदर्भातील मंजूरीची व अदाईची सर्व प्रकरणे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे सादर करणे.

**निवृत्त वेतन शाखाः-**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८२ च्या नियमाचे अधिन राहून जिल्हा परिषद कर्मचा-यांचे वर्ग-३ च्या बाबतीत वयास ५८ वर्ष व वर्ग-४ च्या बाबतीत ६० वर्ष पुर्ण झाल्यानंतर सेवानिवृत्त, इतर प्रकारे सेवानिवृत्त होणा-या तसेच मयत कर्मचा-यांच्या प्रकरणांची छाननी करून सेवानिवृत्ती तसेच कुटूंब निवृत्ती वेतन मंजुर करण्यात येते.